दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक २९० ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शुक्रवार दि.१४ जानेवारी २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com



# दिबांचे नाव लागल्याशिवाय विमान उडणार नाही : ना.रामदास आठवले

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरणासाठी सर्वपक्षीय कृती समितीची भूमीपुत्र निर्धार परिषद संपन्न



**दै.रायगड नगरी । पनवेल**

**दिबा सर्वांचे बाप होते, त्यांनी सर्व महाराष्ट्रासाठी संघर्ष केला आहे, त्यामुळे दिबांचे नाव लागल्याशिवाय विमान उडणार नाही, अशा शब्दात नवी मुंबई विमानतळाला प्रकल्पग्रस्तांचे नेते दि. बा. पाटील यांचेच नाव देण्याची आग्रही मागणी केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांनी कोल्ही कोपर येथे नवी मुबई विमानतळ क्षेत्रात झालेल्या भूमिपुत्र निर्धार परिषदेत केली. तसेच ठाकरे सरकारला भूमिपुत्रांचे प्रश्न सोडवता येत नसतील तर त्यांनी सत्ता सोडावी, अशा शब्दात घणाघाती टीका त्यांनी राज्य सरकारवर केली. त्याचबरोबर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी वडिलांच्या नावाचा विचार न करता वडीलधारी दिबांचे नाव देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहनही केले.**

लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीच्या माध्यमातून दिबासाहेबांच्या जयंतीचे औचित्य साधून आज भूमिपुत्रांची 'भूमिपुत्र परिषद' आयोजित करण्यात आली होती. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या परिषदेला माजी खासदार जगन्नाथ पाटील, माजी खासदार संजीव नाईक, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार गणपत गायकवाड, आमदार महेश बालदी, माजी आमदार सुभाष भोईर, कॉम्रेड भूषण पाटील, भारतीताई पवार, माजी उपमहापौर जगदिश गायकवाड, नंदराज मुंगाजी, संतोष केणे, गुलाब वझे, भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, दशरथ भगत, उपमहापौर सीता पाटील, सभागृहनेते परेश ठाकूर, राजाराम पाटील, जे. डी. तांडेल, राजेश गायकर, दीपक म्हात्रे, सुनिल म्हात्रे, रुपेश धुमाळ, सदानंद वास्कर, कांचन घरत, सुनील पाटील, प्रशांत पाटील, गोवर्धन डाऊर, के. के. म्हात्रे, सीमा घरत यांच्यासह रायगड, ठाणे, मुंबई, नवी मुंबई, पाल–घर, कल्याण, डोंबिवली आदी विभागातील समस्त हजारो भूमिपुत्र उपस्थित होते. तत्पूर्वी दिबांच्या पनवेल येथील संग्राम निवासस्थानी, तसेच जासई येथे तसेच गावोगावी दिबांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना आदरांजली वाहण्यात आली.

नामदार रामदास आठवले यांनी पुढे बोलताना सांगितले कि, दिबांचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राहिला आहे, त्याच्यामुळे सर्वसामान्य लोकांच्या हिताचे अनेक निर्णय सरकारला घेणे भाग पडले आहे. दिबा संघर्षशील नेते होते. लोकप्रतिनिधी म्हणून त्यांनी गौरवशाली कार्य केले आहे. समाजाला न्याय देण्याचा संघर्ष सर्वानी पाहिला आहे. त्यामुळे वाटेल ते झाले तरी चालेल पण विमानतळाला दिबांचेच नाव लागलं पाहिजे असे सांगतानाच त्यांच्या नावासाठी आरपीआयचा जा–हीर पाठिंबा असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

नामदार रामदास आठवले यांनी पुढे म्हंटले कि, रामशेठ ठाकूर आणि मी मित्र आहे. ते एक

> धगधगती आग भूमिपुत्रांच्या मनात आहे. दृढनिश्चय असल्याने यशस्वी झाल्याशिवाय थांबायचे नाही. दिबांचे नाव आणि भूमिपुत्रांचे प्रश्न हे प्रकल्पग्रस्तांच्या अस्तित्वाचे प्रश्न आहेत, ते सोडविल्याशिवाय शांत बसायचे नाही.
>
> **-लोकनेते रामशेठ ठाकूर**

दिलदार व्यक्तिमत्व आहे. संघर्ष करून ते पुढे आले. दिबांच्या नेतृत्वाखाली संघर्ष करणारा माणूस म्हणून आम्ही त्यांना ओळखतो. दिबांनी सर्वांसाठी संघर्ष केला. भूमिपुत्रांना न्याय मिळावा म्हणून ते जेलमध्येही गेले आहेत.

सिडकोने जमिनी घेतल्या पण मात्र प्रकल्पग्रस्तांच्या जीवनाचा विचार सिडकोने केला नाही. गावांचे योग्य पुनर्वसन, बांधकाम परव–ानगी, रोजगार, नोकरी, असे अनेक प्रश्न आहेत ते सिडको आणि राज्य सरकार सोडवू शकतात. ते प्रश्न सोडविण्याच्या दृष्टिकोनातून जाणूनबुजून दुर्लक्ष होत असल्याची प्रतिक्रियाही त्यांनी यावेळी दिली. यावेळी त्यांनी त्यांच्या शैलीत सिडको, ठाकरे सरकारचा खरपूस समाचार घेतला. यावेळी नामदार रामदास आठवले यांनी दिबांच्या वर कविता सादर करत त्यांना आदरांजली वाहिली. तसेच भीमशक्ती दिबाशक्ती मध्ये एकवटली असल्याचे यावेळी अधोरेखित केले. न्याय मिळत नाही म्हणून मागण्यांसाठी हा एल्गार आहे, असेही त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय भाषणात कृती समितीचे उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भूमिपुत्रांच्या दृष्टिकोनातून दोन ठराव जाहीर केले. काहीही झाले तरी दिबांच्या १०० व्या जयंतीपूर्वी दिबांचे नाव विमानतळाला लागलेच पाहिजे तसेच सिडको संदर्भातील प्रकल्पग्रस्तांचे, बहुजनांचे प्रश्न सुटलेच पाहिजे नाही तर २४ जानेवारीला विमानतळाचे काम करून द्यायचे नाही असे दोन ठराव त्यांनी जाहीर करताच सर्व उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाट स्वागत केले.

यावेळी कृती समितीचे कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रास्ताविकातून दिबांच्या नाव–ाचा गजर केला. दिबांच्या नावाचे आंदोलन आपले मानून सर्वांनी या लढ्यात सहभाग घेतल्याबद्दल

> दिबासाहेबांनी भूमीच्या रक्षणासाठी जन्म घेतला. सिडकोने दिबांनाही त्रास दिला. सह्याद्रीच्या दगडासारखे दिबा कणखर होते. संघर्षाच्या योद्धयाला सलाम करण्यासाठी मी कोल्हापूरवरून आलो आहे. संघर्ष पहायचा असेल तर आगरी कोळी यांचा पहा असे मी पश्चिम महाराष्ट्रात सांगत असते. पश्चिम महाराष्ट्रात दिबांसारखा नेता निर्माण झाला असता तर तर त्या ठिकाणी प्रकल्पग्रस्तांवर बिकट परिस्थिती आली नसती. दिबांचे नाव विमानतळाला दिल्याशिवाय स्वस्थ बसायचे नाही.
>
> **-भारतीताई पवार**

सर्वांचे आभार मानले. आंदोलन होऊ नये यासाठी सिडकोने अनेक प्रयत्न केले पण दिबांचे नाव प्रत्येक भूमिपुत्रांच्या हृदयात असल्याने हे आंदोलन दिबांचे नाव लागेपर्यत सुरूच राहणार असल्याचे स्पष्ट केले. जीवाचे काहीही झाले तरी चालेल पण दिबांचे नाव लागलेच पाहिजे हे भूमिपुत्रांनी दाखवून दिले असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.



*प्रकल्पग्रस्तांचे झुंजार नेते लोकनेते दि.बा.पाटील यांच्या ९६ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या संग्राम या निवासस्थानी जाऊन त्यांच्या प्रतिमेला अभिवादन करताना मा.खा.रामशेठ ठाकूर, आमदार बाळाराम पाटील, आ.प्रशांत ठाकूर, माजी नगराध्यक्ष जे.एम.म्हात्रे, पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, मा.उपमहापौर जगदीश गायकवाड, भारती पवार.*

## संक्षिप्त...

### राष्ट्रवादीचा भाजपाला मोठा धक्का, प्रसाद लाड पराभूत

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत भाजपाला मोठा धक्का बसला आहे. अध्यक्षीय निवडीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसने भारपाचा धक्कादायकरीत्या पराभव केला आहे. आज झालेल्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार सिद्धार्थ कांबळे यांनी भाजपाचे उमेदवाप प्रसाद लाड यांना पराभूत करत अध्यक्षपद पटकावले. हा पराभव भाजपासाठी मोठा धक्का मानला जात आहे.गेली अनेक वर्षे बँकेची प्रवीण दरेकर यांच्याकडे सूत्रे होती. मात्र त्यांचा मजूर म्हणून बँकेवर निवडून येण्याचा फंडा यंदा वादात सापडला होता. त्यामुळे दुसऱ्या मतदार संघातून ते संचालक पदी म्हणून निवडून आले. संचालकांत शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस, असे एकूण ११ संचालक होते. भाजपकडे ९ संचालक होते. दरम्यान, अध्यक्ष पदासाठी राष्ट्रवादीचे सिद्धार्थ कांबळे तर उपाध्यक्ष पदासाठी शिवसेनेचे अभिषेक घोसाळकर यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले.

## मुंबई-गोवा हायवेवर प्रवाशांना ट्रेलरची धडक ; २ ठार १ गंभीर



**दै.रायगड नगरी । नागोठणे**

मुंबई–गोवा महामार्गावर नागोठण्याजवळील कानसई गावाच्या हद्दीतील हॉटेल बिजली समोर इरटिगा कारमधून रस्त्याच्या बाजूला लघुशंखेसाठी उतरलेल्या तिघांना ट्रेलरची जोरदार धडक बसुन भीषण अपघात झाला. या अपघ–ातात दोन जण ठार तर एक गंभीररित्या जखमी झाला आहे. हा अपघात गुरुवार ( दि.१३) रोजी पहाटे ७.०५ च्या सुमारास घडला.

यासंदर्भात उपलब्ध झालेल्या माहितीनुसार मुंबई–गोवा महामार्गावरून ठाणे येथुन मालवणला जाणारी इरटीगा कार कानसई गावाच्या हद्दीमध्ये असलेल्या हॉटेल बिजलीच्या समोर आली असता चालकाने गाडी रस्त्याच्या बाजूला पार्किंग लाईट लावुन उभी केली. त्यानंतर या कारमधील तिघेजण लघुशंखेसाठी गाडीतुन खाली उतरले. त्यावेळेस मुंबई बाजुकडुन गोव्याच्या दिशेकडे कॉईल घेऊन जाणाऱ्या भरधाव ट्रेलर चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्यामुळे ट्रेलर सरळ जाऊन तिघांना धडकला. नंतर या ट्रेलरने समोर उभ्या असलेल्या इरटीगा कारला पाठिमागुन धडक दिली. या भीषण अपघातात अमित विनोद कवळे(वय–२२) रा.ठाणे हा जागीच ठार झाला. तर टेरेस करवाले व रोहन जाधव या दोघांना पुढील उपचारासाठी माणगाव उपजिल्हा रुग्णालयात नेले असता टेरेस करवाले (वय–२२) रा. ठाणे हा मृत झाल्याचे तेथील वैद्यकीय अधिका–यांनी सांगितले. तर रोहन जाधव याचा पाय फ्रॅक्चर होऊन तो गंभीर जखमी झाला आहे.

दरम्यान या अपघाताची …/२

## समाजसेवक जय कुमार डीगोळेंवर कामोठ्यात प्राणघातक हल्ला

### हल्ला करून अज्ञात इसम फरार ; खाजगी रुग्णालयात उपचार सुरू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामोठे वसाहतीमधील रहिवाशी तसेच समाजसेवक जय कुमार डिगोळे यांच्यावर काही अज्ञात इसमानी प्राण घातक हल्ला करून त्यांना ठार मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना कामोठे वसाहतीमधील सेक्टर ११ मध्ये घडल्याचे समोर आले आहे. या हल्ल्यात डोगोळे गंभीर जखमी झाले असून त्याच्यावर कामोठे मधील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहे. हा हल्ला करताना आरोपीनी लोखंडी सळ्या तसेच, लोखंडी पाईप चा वापर केल्याचे डिगोळे यांनी सांगितले, या घडलेल्या प्रकारा विरोधात अज्ञात इसमावर कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला

जय कुमार डिगोळे हे कामोठे वसाहतीमधील समाजसेवक असून भाजप पक्षात सक्रिय कार्यकर्ते म्हणून काम करतात, डिगोळे ये नेहमी प्रमाणे वसाहतीमध्ये फेरफटका मारून सेक्टर ११ मधील आपल्या राहत्या घरी जाण्यास निघाले,

या वेळी त्यांना त्यांच्या मित्रांनी मोटारसायकल वरून राहत्या सोसायटी शेजारी सोडले, त्या नंतर ते सोसायटीच्या दिशेने निघालो, या वेळी रात्रीचे ८ वाजून ३० मिनिटं झाले होते. डोगोळे हे सोसायटीच्या गेटवर पोचल्या नंतर, काही अज्ञात इसम हे डोगोळे यांची वाट पाहत बसले होते, डोगोळे हे गेट वर पोचल्या नंतर, या अज्ञात इसमानी हाता मध्ये असलेल्या लोखंडी पाईप आणि सळ्यानी त्याच्यावर हल्ला चढवला , डिगोळे यांनी हल्ला परतवण्याचा प्रयत्न देखील केला मात्र, हल्ला इतका भयानक होता की, या मध्ये त्याच्या उजव्या पायाला जखम झाली असून फॅक्चर झाले आहे. तसेच अंगावर इतर ठिकाणी मुक्का मार देखील लागला आहे. हा हल्ला करतांचा आपले प्राण वाचवण्यासाठी त्यांनी सोसायटीमध्ये धाव घेतली, आणि याच वेळी, हे अज्ञात इसम सोसायटीच्या गेट वर परत पळून गेले, या वेळी हे हल्लेखोर रिक्षाच्या मदतीने मधून पळून गेले असल्याची माहिती डिगोळे यांनी दिली, या अज्ञात इसमावर गुन्हा दाखल झाला असून अज्ञात इसमाचा शोध पोलीस घेत आहे.

## बॉलिवूड अभिनेता हेमंत बिर्जे यांचा भीषण अपघात

**दै.रायगड नगरी । खोपोली**

टारझन'ची भुमिका साकारलेले अभिनेते हेमंत बिर्जे यांचा काल मुंबई – पुणे एक्सप्रेस वे वर अपघात झाला. सर्दीची गोळी घेऊन गाडी चालविल्याने डोळ्यावर झापड येऊन हा अपघात झाल्याची माहिती समोर आली आहे. सध्या ते एका खाजगी रुग्णालयात उपचार घेत आहेत.

अभिनेता बिर्जे हे मुंबईत राहतात. बदललेल्या हवामानामुळे त्यांना सर्दी झाली होती. त्यांनी त्यांच्या पुण्याच्या घरी जायचे नियोजन केले होते. बिर्जे, त्यांची पत्नी आणि …/२



# हृदयी वसंत फुलताना

मानवी हृदयाच्या जागी डुकराच्या हृदयाचे रोपण करणारी शस्त्रक्रिया अमेरिकेत यशस्वी झाल्याने, जीव वाचविण्याच्या दृष्टीने आशेचे किरण निर्माण झाले आहेत. शरीरातील महत्त्वाचे अवयव निकामे झालेल्या रुग्णाला जीवदान देण्यासाठी, त्याच अवयवाचे रोपण करणे गरजेचे असते. रोपणासाठी मानवी अवयव मिळण्यात अडचणी आहेत. काही अवयव दात्यांकडून मिळतात; पण अवयवदानाबद्दल व्यापक जागरूकता अद्याप निर्माण झालेली नाही. मृत्यूनंतर लगेचच काही अवयव दान करता येतात. ब्रेन डेड, म्हणजे विशिष्ट कारणांमुळे ज्यांचा मेंदू मृत झाला आहे, अशी व्यक्ती सर्वच अवयवांचे दान करून गरजूंना जीवदान देऊ शकते; मात्र या साऱ्याला खूप मर्यादा असल्याने, अवयवांच्या प्रतीक्षेत असलेले रुग्ण जगभर वाढत आहेत. या सर्वांसाठी; तसेच एकूणच मानवी आयुष्यमान लांबविण्यासाठी खुशखबर म्हणावी अशी शस्त्रक्रिया अमेरिकेतील मेरिलँड विद्यापीठाच्या वैद्यकीय केंद्रात नुकतीच घडली. ५७ वर्षांच्या रुग्णावर डुकराच्या हृदयाचे रोपण करण्यात डॉक्टरांना यश आले आहे. संबंधित रुग्ण हृदयाच्या दुखण्यामुळे जगण्याची शक्यता जवळ जवळ नव्हती; त्यामुळे मानवी हृदयाचे रोपण करण्यास तो अपात्र ठरविला गेला होता. जगण्याची शक्यता नसताना, डुकराचे हृदय रोपण करून घेण्याची तयारी रुग्णाने दर्शविली, ती केवळ शेवटची संधी म्हणून! प्रतिकूल परिणाम होऊ नये यासाठी शास्त्रज्ञांनी केलेले संशोधन, निष्णात डॉक्टरांनी केलेली काळजीपूर्वक शस्त्रक्रिया यांमुळे रोपण यशस्वी झाले. रुग्णाची प्रकृती ठीक असून, तो स्वतः श्वास घेऊ शकत आहे. पुढील काही दिवसांत त्याच्या प्रकृतीत सुधारणा होत गेली, तो पूर्णपणे बरा झाला, तर त्याच्या आयुष्यात खरेच नवा वसंत फुलेल आणि वैद्यक क्षेत्रातही प्राण्यांचे अवयव रोपण करण्याचे नवे दालन खुले होईल. मानवी शरीरात प्राण्यांचे अवयव रोपण करण्याचा हा काही पहिला प्रयोग नव्हता; परंतु यापूर्वीच्या प्रयोगांना यश आले नव्हते. भारतातही २५ वर्षांपूर्वी डॉ. धनीराम बारुआ यांनी एका रुग्णावर अशी शस्त्रक्रिया केली होती. संबंधित रुग्णावर डुकराचे हृदय आणि फुफ्फुसाचे रोपण करण्यात आले होते. रुग्ण आठ दिवस जिवंत होता, त्यानंतर त्याचे निधन झाले. डॉ. बारुआ यांनी अशा प्रकारची शस्त्रक्रिया करताना आवश्यक ते परवाने घेतले नव्हते आणि त्यामुळे त्यांना अटक करण्यात आली होती. अमेरिकेतील घटनेमुळे बारुआ यांची शस्त्रक्रिया चर्चेत आली आहे; परंतु अशा प्रयोगांत संशोधनाची शिस्त, संस्थात्मक काम, कायदेशीर प्रक्रियांची पूर्तता आणि संशोधनाबद्दलची पारदर्शकता महत्त्वाची असते. अमेरिकेतील संशोधकांनी शस्त्रक्रियेच्या आधी योग्य ते परवाने घेतले होते. डुकराचे हृदय मानवी शरीरात बसविण्यासाठी, त्यात जनुकीय बदलही केले. जी जनुके मानवी शरीर स्वीकारणार नाहीत, ती काढून टाकली गेली; तसेच मानवी शरीराला आवश्यक ठरतील अशी काही जनुके घेतली गेली. थोडक्यात, डुकराच्या हृदयात जनुकीय बदल करण्यात आले. रुग्णाच्या शरीराने बाह्य अवयव स्वीकारावे, यासाठीही औषधे दिली गेली. त्यानंतर प्रत्यक्ष रोपणाची शस्त्रक्रिया झाली. शस्त्रक्रियेनंतर रोपण केलेले हृदय योग्य पद्धतीने काम करीत आहे; त्यामुळे रोपण यशस्वी झाल्याचे मानले जात असले, तरी पुढील काही दिवस प्रतीक्षा करावी लागेल. त्यानंतरच अंतिम यशावर शिक्कामोर्तब होईल. या प्रयोगानंतर कृत्रिम अवयव रोपणातील सर्व अडथळे पार होतील आणि प्राण्यांच्या अवयवांचे रोपण सहजसुलभ होईल, असा निष्कर्ष लगेच काढता येणार नाही. वैद्यक आणि संशोधन क्षेत्रांतूनही सावध प्रतिक्रिया येत आहेत. अशा शस्त्रक्रियेत सुरक्षितता खूपच महत्त्वाची असते; तसेच ते व्यवहार्य होणेही गरजेचे असते. काही नैतिक मुद्देही यात आहेत. अमेरिकेतील रुग्णाने शेवटची संधी म्हणून हा मार्ग स्वीकारला असला, तरी सर्व रुग्णांबाबत ही स्थिती असणार नाही; त्यामुळे प्राण्यांचे अवयव मानवांत रोपण करण्याबाबत अधिक संशोधन होण्याची आवश्यकता आहे. अमेरिकेतील शस्त्रक्रियेने एक दिशा निश्चितच दाखवली आहे. या दिशेने जात, त्यातील आव्हानांचा सामना करीत आणि अधिक सुरक्षित, व्यवहार्य पर्यायांचा शोध घेत शास्त्रज्ञांना काम करावे लागणार आहे. ते अर्थातच त्यासाठी सज्ज आहेत. त्यांच्या संशोधनांतून आधुनिक जैव आणि वैद्यक तंत्रज्ञानाचे आविष्कार समोर येणार आहेत. अमेरिका; तसेच अन्य प्रगत देशांत संशोधनासाठी सुविधा आणि निधी या दोहोंची कमतरता नाही. आपल्याकडे मात्र विरुद्ध चित्र आहे. सुविधाही कमी आणि निधीचीही चणचण अशी स्थिती आहे. त्यावरही मात करून काही मंडळी धडपडत आहेत; त्यांना बळ देण्याची, बारुआंसारखे कोणी वैयक्तिक प्रयत्न करीत असल्यास त्याला संस्थात्मक जोड देण्याची आणि संशोधन निधी वाढविण्याची गरज आहे. डुकराचे हृदय मानवावर रोपण करण्याने संशोधनाचा मुद्दाही ऐरणीवर आणला आहे.

# आगरी युवा संघटनेचा पाचवा वर्धापनदिन संपन्न



**दै.रायगड नगरी । दिघी**

श्रीवर्धन तालुक्यातील वडवली गावातील मुंबईस्थित आगरी युवा संघटनेचा पाचवा वर्धापनदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. रविवारी, ता ९ जानेवारी २०२२ रोजी विले पार्ले येथे सायंकाळी झालेल्या या कार्यक्रमाला अनेक मान्यवर उपस्थित होते.

आगरी युवा संघटनेच्या पाचव्या वर्धापनदिनानिमित्त संघटनेने 'गुणगौरव आणि मार्गदर्शन सोहळा' आयोजित केला होता. कार्यक्रमाच्या सुरुवातीला संघटनेने पाच वर्षांत केलेलता कामाची माहिति धनंजय चौलकर यांनी दिली. कार्यक्रमाचे उदघाटन उमेश नाईक यांच्या शुभहस्ते झाले तर कार्यक्रमाचे अध्यक्ष नारायण नाक्ति हे होते. सुभाष चौलकर, सुनील नाक्ती, चंद्रकांत नाक्ति, संगीता नाक्ति, शैलेन्द्र चौलकर, उपेंद्र पाटील, संदेश पाटील , दिनेश पयेर, निशित गायकर व इतर उपस्थिति मान्यवारांचे आभार व सत्कार रूपेश चालके, संतोष कांबले, नीलेश गानेकर, मंगेश बिराड़ी, मंगेश कांबले , कृष्णा बिराडी, राजा पाटिल , संकेश बिराडी, नितेश नाक्ती ,रोहित खानलोस्कर, अनिल नाक्ति आदी केला.

यावेळी प्रतिकुल परिस्थितीत वेगवेगळ्या क्षेत्रात यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक, क्रीडा, सामाजिक, सांस्कृतिक, रोजगार, करिअर, आगरी समाज बळकटी करण, युवा परिवर्तन, आगरी संस्कृतीकरण, आगरी महिला लघुद्योग, महिला सक्षमीकरण, आगरी महिला एकीकरण अशा विविध विषयांवर महत्वपूर्ण मार्गदर्शन श्रीवर्धन तालुक्यातील सहकार्य सामाजिक संस्थेचे अध्यक्ष नीलेश नाक्ति यानी केले. आजघडीला आगरी युवकांपुढे अनेक आव्हाने आहेत. ती समर्थपणे पेलण्यासाठी त्यांना योग्य दिशा दाखवणे गरजेचे आहे. यासाठी आगरी युवा युवा संघटना'ही समाजातील युवकांना विविध क्षेत्रात पुढे जाण्यासाठी प्रोत्साहन करत असल्याचे प्रतिपादन प्रमुख मान्यवरांनी केले. संघटनेने आत्तापर्यंत १२५ हुन अधिक तरुणांना शिक्षण घेण्यास प्रवृत्त करून शिक्षण घेऊ दिले आहे याशिवाय अनेक विद्यार्थ्यांना करियरविषयक मार्गदर्शन केले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण नाक्ती यांनी केले तर मान्यवरांचे आभार प्रदर्शन धनंजय चौलकर यांनी केले. कामानिमित्त मुंबईत वास्तव्यास असलेल्या सर्वांनी या विद्यार्थ्यांच्या गुणगौरव सोहळ्याला उपस्थित दर्शवली. अपूर्ण शिक्षण पूर्ण करण्यास मदत केल्याबद्दल लमिषा चौलकर , निकिता नाक्ति , जिग्नेश बिराड़ी यांनी संघटनेचे आभार व्यक्त केले. आगरी समाज परिवर्तनसाठी एकत्र येण्याची साद यावेळी युवकांनी दिली. शिक्षणासाठी आवश्यक मदत करण्याचा निर्धार यावेळी आगरी युवकांनी केला.

# सर्दी, खोकला, घसा दुखी आणि ताप या आजारांनी रहिवाशांना ग्रासले

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील शहरी तसेच ग्रामीण भागातील रहिवाशांना सध्या सर्दी, खोकला, घसा दुखी आणि ताप या आजारांनी ग्रासले आहे.त्यामुळे सदर आजारांवर उपचार करून घेण्यासाठी रुग्णालये हाऊसफुल्ल झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

हवेत वाढणारा गारवा आणि सातत्याने हवेत होणारा बदल यामुळे उरण तालुक्यातील शहरी भागात व ग्रामीण भागातील रहिवाशांना सध्या सर्दी, खोकला, घसा दुखी आणि ताप यासारख्या आजारांनी ग्रासले आहे. त्यामुळे अनेक रुग्ण उपचारासाठी खाजगी रुग्णालयात उपचारासाठी गर्दी करत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.त्यात सध्या कोरोना बाधित रुग्णांमध्ये वाढ होत असल्याने रहिवाशी भिंतीच्या सावटाखाली वावरत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

डॉक्टर प्रकाश मेहता यांनी माहिती देताना सांगितले की सध्या कोरोनाच्या संकटात सापडले रहिवाशी स्वतःला आपल्या कुटुंबाला सावरण्यासाठी डॉक्टरांच्या सल्ल्याने प्रयत्न करत आहेत.

त्यात सध्या हवामानातील बदलामुळे आणि वाढत्या गारव्यामुळे रहिवाशांना सर्दी, खोकला, घसा दुखी आणि ताप यासारख्या आजारांचा सामना करावा लागत आहे. तरी रहिवाशांनी घाबरून न जाता आपले परिसर स्वच्छ ठेवून घरातील पाणी उकळून घ्यावे,तेलकट पदार्थ खाणे टाळावे तसेच घाबरून न जाता आप आपल्या परिसरातील डॉक्टरांच्या सल्ल्याने सदर आजारांवर उपचार करून घ्यावेत.

# स्व.शंकर पाटील यांना अभिवादन





**दै.रायगड नगरी । पनवेल**

शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते स्वर्गीय शंकर शेठ शिवराम पाटील यांच्या चौथ्या पुण्यस्मरण दिनानिमित्त पनवेलच्या शेतकरी कामगार पक्ष कार्यालयात त्यांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी स्वर्गीय शंकर शेठ पाटील यांना अभिवादन करण्यासाठी आमदार बाळाराम दत्तात्रय पाटील, पनवेल नगर परिषदेचे माजी आदर्श नगराध्यक्ष जे एम म्हात्रे, शेतकरी कामगार पक्षाचे माजी पनवेल तालुका चिटणीस जेष्ठ नेते नारायण शेठ घरत, पनवेल कृषी उत्पन्न बाजार समिती चे सभापती डॉ. दत्तात्रेय पाटील, संचालक संतोष पाटील, सहकारी भात गिरणीचे चेअरमन एम सी पाटील, संचालक गणेश गायकर, संचालक भाई तांबोळी, पंढरीनाथ झिंगे, सुनील मोकल, कृष्णा पाटील, प्रकाश आमरसकर आदी मान्यवर सह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रामचंद्र म्हात्रे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय युवा दिन संपन्न

**दै.रायगड नगरी । उरण**

ज्ञान प्रसारक शिक्षण संस्था संचालित, रामचंद्र म्हात्रे विद्यालय ऍण्ड ज्युनियर कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स ऍण्ड कॉमर्स आवरे, ता. – उरण, जि. – रायगड येथे राष्ट्रीय युवा दिन ज्ञान प्रसारक शिक्षण संस्थेचे विश्वस्त प्राचार्य राजेंद्र म्हात्रे यांच्या प्रमुख उपस्थित संपन्न झाला. यावेळी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त मेघा म्हात्रे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले

या प्रसंगी प्राचार्य राजेंद्र म्हात्रे यांनी राजमाता जिजाऊ यांच्या कार्याची महती पटवून दिली. छत्रपती शिवाजी महाराजांना हिंदवी स्वराजाची प्रेरणा देऊन ते उभे करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. तसेच स्वामी विवेकानंद यांनी अध्यात्मिक, सामाजिक क्षेत्रात केलेले कार्य, स्वामींचे आदर्श व्यक्तिमत्व, देशभक्ती अशा विविध क्षेत्रात केलेल्या योगदानाची माहिती दिली.

प्राचार्य बाळासाहेब म्हात्रे यांनी आवरे गावात जन्म घेवून प्रतिकुल परिस्थितीत स्वतःचे शिक्षण पूर्ण करून गोरगरिबांच्या मुलांना शिक्षण प्राप्त व्हावे यासाठी अविरत प्रयत्न केले. त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा आढावा घेतला. पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, वरिष्ठ महाविद्यालये व तंत्र शिक्षण अशा क्षेत्रात अनेक शैक्षणिक उपक्रम निर्माण केले. या शैक्षणिक उपक्रमातून शिक्षण, कला, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातुन स्थानिक पातळीपासून राष्ट्रीय पातळीपर्यंत विद्यार्थ्यांनी नावलौकिक संपादित केला आहे. प्राचार्य बाळासाहेब म्हात्रे यांच्या कार्याची प्रेरणा घेवून विद्यार्थ्यांनी शिक्षण, कला, क्रीडा, व सांस्कृतिक क्षेत्रात प्रगती करून सर्वांगीण विकासावर भर दिला पाहिजे असे मौलिक विचार त्यांनी आपल्या भाषणातून दिले.

या प्रसंगी ज्ञान प्रसारक शिक्षण संस्थेच्या विश्वस्त मेघा म्हात्रे, बांधकाम व्यावसायिक जमाल सिद्धिकी, नाट्य व सिने कलावंत सुयश म्हात्रे, तसेच कॉलेजचे प्राचार्य सुभाष ठाकूर, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शरद केणी यांनी केले.




## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली नमूद केलेली शेतजमीन मिळकती त्यांचे विद्यमान मालक यांच्याकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.**

| मौजे | सर्व्हे नंबर / हिस्सा नंबर | मुळ भूखंड क्र. | अंतिम भूखंड क्र. | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|
| पनवेल (तक्का) ता.पनवेल | ३८५/अ ३८५/ब | ३०० | ३०२ | ५९४६.०० |

सदर मिळकत निर्वेध असल्याची हमी विद्यमान मालक यांनी दिली आहे. तरी सदर मिळकतीचे बाबतीत अथवा तिच्या कोणत्याही हिश्श्याचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्तखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीन, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा वगैरे कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील पत्यावर प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी हरकती प्रत्यक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे विक्री व हस्तांतरणाचे व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

दि.१३/०१/२०२२
पनवेल

**सही/-**
**ॲड.प्रगती दिनेश ठाकूर**
**नगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स,**
**ऑफिस क्र.२२, वासुदेव बळवंत फडके**
**नाट्यगृहाजवळ, पनवेल, रायगड**
**मो.नं.९१७२५६११११**



मा.पांडे साहेब कोर्ट

अर्जदाराचे वकील : ॲड.रश्मी बळीराम जाधव

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या कोर्टात

क्रिमिनल एम.ए.नं.४८/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.०९/०२/२०२२

श्रीमती.सरस्वती चिंधु गवते
वय : ७५ वर्षे, मु.पो.नेरे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
ग्रुप ग्रामपंचायत चिपळे
आरोग्य विभाग
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

सदर प्रकरणी जाहीर नोटीस प्रकाशित करणे आवश्यक असल्यामुळे सर्व लोकांस असे कळविण्यात येते की, अर्जदार श्रीमती.सरस्वती चिंधू गवते यांचे वडील स्व.आंबो पांग्या गवते हे दि.१०/०१/१९६३ रोजी मयत असल्या कारणाने अर्जदारांचे वडिलांची मृत्यूची नोंद करून मिळणे करिता अर्ज दाखल केला आहे. स्व.आंबो पांग्या गवते रा.बोनशेत, ता.पनवेल, जि.रायगड येथे त्यांच्या राहत्या घरी मृत्यू झाला असल्याने अर्जदाराने या न्यायालयात स्व.आंबो पांग्या गवते यांच्या मृत्यूच्या तारखेची नोंद होण्याकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

सदरहून स्व.आंबो पांग्या गवते हे वर नमूद ठिकाणी मयत झालेल्या आहेत किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीर नोटीसच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवावे. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहून मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहून न्यायालय अर्जदार यांच्याकडे लागलीच पुरावा घेवून त्यास सदरहून व्यक्तीचे मृत्यूची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.१२/०१/२०२२ रोजी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्या.क.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्या.क.स्तर, पनवेल**


# गोळेगणी येथे आंबापीक शेती शाळा अन् कृषी यांत्रिकीकरण प्रात्यक्षिकांना प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

महाराष्ट्र शासन कृषी विभाग यांच्या वतीने आत्मा योजनेअंतर्गत आंबा पीक शेतीशाळा कार्यक्रम सोबत कृषी यांत्रिकीकरण अंतर्गत होंडा कंपनीच्या शेती विषयक विविध उपकरणाचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. यावेळी शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असता पोलादपूर तालुका कृषी अधिकारी सुरज पाटील यांनी महाडीबीटी पोर्टल वर शेतकऱ्यांनी ऑनलाइन अर्ज करून अनुदानाचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

या शेतीशाळेच्या अध्यक्षस्थानी तालुका कृषी अधिकारी सुरज पाटील, मंडळ कृषी अधिकारी श्रीरंग मोरे, कृषी सहाय्यक मनोज जाधव, अनिल डासाळकर, होंडा कंपनीचे प्रतिनिधी निखील पोहरे, रायगड जिल्हा होंडा कंपनी अधिकृत विक्रेते राहुल गोडसे,सरपंच नितीन मोरे, नामदेव येरुणकर, शेखर येरूणकर, ज्ञानेश्वर मोरे, प्रकाश दळवी,बाळकृष्ण मोरे, सागर मोरे, प्रवीण महाडिक, राजेंद्र दळवी, सुरेशराव मोरे आदी उपस्थित होते

तालुका कृषी अधिकारी सुरज पाटील यांनी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शनावेळी मजुरांच्या टंचाईवर आधुनिक यंत्रसामग्रीचा वापर करून शेती करणे काळाची गरज असल्याचे सांगत महाडीबीटी पोर्टल वर जास्तीत जास्त अर्ज ऑनलाईन करून शासनाच्या शेती विषयक अवजारे ५० टक्के अनुदानाचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

यावेळी कृषी पर्यवेक्षक श्रीरंग मोरे यांनी आंबा लागवड छाटणी आंबा मोहर संरक्षण या बाबत मार्गदर्शन केले. होंडा कंपनीचे प्रतिनिधी निखील पोहरे यांनी होंडा कंपनीचे उत्पादने त्याबाबत माहिती देऊन प्रात्यक्षिक करून दाखवले. यांत्रिकीकरणाचे प्रात्यक्षिकावेळी शेतकऱ्यांनी स्वत: अवजारे चालवून माहिती करून घेतल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन कृषी सहाय्यक मनोज जाधव यांनी केले. तर आभार प्रदर्शन अनिल डासाळकर यांनी केले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अनिकेत मोरे, अनिरुद्ध येरूणकर,संजय मोरे, प्रसाद पवार, विनोद मोरे, विकास येरूणकर, अविनाश येरूणकर, दीपक सूर्वे, दीपक कदम यांनी सहकार्य केले.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## मुंबई-गोवा हायवेवर प्रवाशांना ट्रेलरची धडक ; २ ठार १ गंभीर

माहिती मिळताच महामार्ग पोलिसांच्या वाकण मदत केंद्राचे पोलिस उपनिरीक्षक परशुराम भोईर व नागोठणे पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक चव्हाण व त्यांचे सर्व सहकारी घटनास्थळी दाखल झाले. मृत झालेल्या व्यक्तीला शव विच्छेदनासाठी नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रात तर जखमींना माणगाव येथे पाठवण्यात आले. या अपघाताचा पुढील तपास नागोठणे पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक तानाजी नारनवार यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे.

## बॉलिवूड अभिनेता हेमंत बिर्जे यांचा भीषण अपघात

मुलगी हे पुण्याला जायला निघाले होते. जाण्यापूर्वी बिर्जे यांनी सर्दीच्या दोन गोळ्या घेतल्या आणि ते त्यांच्या चारचाकी वाहनातून पुण्याकडे निघाले. ते स्वतः गाडी चालवित होते. लोणावळ्याच्या पुढे आल्यानंतर उर्से टोकनाक्याजवळ बिर्जे यांच्या डोळ्यावर झापड आली. तशाच अवस्थेत डोळे ताणण्याचा प्रयत्न ते करीत होते. पण अखेर त्यांच्या डोळ्यावर झापड आलीच आणि त्यांचा गाडीवरचा ताबा सुटला. त्यांची गाडी डिव्हायडरला जाऊन धडकली. या अपघातात बिर्जे, त्यांची पत्नी आणि मुलगी जखमी झाले. त्यांना खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांना एवढी गुंगी आली होती की काही काळ आपल्याबरोबर कोण कोण प्रवास करत होते, याचा देखील त्यांना विसर पडला होता. काही काळानंतर त्यांना ते आठवले.


## कर्जत नगर परिषद

KARJAT MUNICIPAL COUNCIL

**ता.कर्जत, जि.रायगड, पिन-४१०२०१**

Email : karjatcouncil@gmail.com **ऑफिस : ०२१४८-२२२०३३**

**क्रकनप/भां.वि/७२/२१-२२** **दिनांक : १३/०१/२०२२**

### जाहीर निविदा सूचना

**कर्जत नगरपरिषदेकडून पात्रताधारक व इच्छुक वार्षिक ठेकेदार नेमणूक करणे करिता फेर निविदा मागविण्यात येत आहेत.**

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा फॉर्म फी | अनामत रक्कम |
|---|---|---|---|
| १ | १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, जयंती-पुण्यतिथी तथा विविध सभा कार्यक्रमांसाठी आवश्यक साहित्य, अल्पोपहार, जेवण, हार, बुके पुरविणे | ५००/- | २०००/- (D.D.भरणे) |

**कामाच्या अटी व शर्ती :-**

**१) निविदा पत्रक विक्रीची तारीख दि.१४/०१/२०२२ ते २०/०१/२०२२ पर्यंत सायं.५.०० पर्यंत असून निविदा स्वीकारण्याचा कालावधी दि.२१/०१/२०२२ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत राहील.**

**२) निविदा उघडणेचा कालावधी २१/०१/२०२२ सायं.५.३० वा. किंवा प्रशासकीय सोयीनुसार राहील.**

**सही/-** **(डॉ.पंकज पाटील)** **मुख्याधिकारी** **कर्जत नगरपरिषद, कर्जत**

**सही/-** **(सुवर्णा केतन जोशी)** **अध्यक्षा** **कर्जत नगरपरिषद, कर्जत**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले. दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांचा रायगड जिल्हा दौरा

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्यमंत्री उद्योग आणि खनिकर्म, पर्यटन, फलोत्पादन, क्रीडा व युवक कल्याण, राजशिष्टाचार, माहिती व जनसंपर्क, विधी व न्याय तथा पालकमंत्री रायगड ना.कु.आदिती तटकरे यांचा मंगळवार, दि.१४ जानेवारी २०२२ रोजीचा रायगड जिल्हा दौरा पुढीलप्रमाणे– सकाळी ९.३० वाजता सुतारवाडी येथून वाहनाने श्रीवर्धनकडे प्रयाण. सकाळी ११.०० वा. मौजे रानवली, ता.श्रीवर्धन येथे आगमन व नळ पाणीपुरवठा योजना व जल शुद्धीकरण संयंत्र बसविणे कामाचे उद्घाटन समारंभास उपस्थिती. सकाळी ११.४५ वा. मौजे शिरवणे येथे नळ पाणीपुरवठा योजना कामाच्या भूमिपूजन समारंभास उपस्थिती. दुपारी १२.४५ वाजता मौजे वावे पंचतन येथे नळ पाणीपुरवठा योजना कामाच्या भूमिपूजन समारंभास उपस्थिती. दुपारी १.१५ वा. मौजे वाकळघर येथे नळ पाणीपुरवठा योजना कामाच्या भूमिपूजन समारंभास उपस्थिती. दुपारी २.३० वाजता मौजे वाकळघर येथून वाहनाने वडवलीकडे प्रयाण. दुपारी ३.०० वा. वडवली येथे आगमन व संदीप क्रीडा मंडळ आयोजित कबड्डी स्पर्धेस भेट (स्थळ– वडवली बस स्टँडजवळ, वडवली, ता.श्रीवर्धन). दुपारी ३.१५ वा.वडवली येथून वाहनाने आदगावडे प्रयाण. दुपारी ३.३० वा. आदगांव येथे आगमन व महर्षि वाल्मिकी आदीवासी कोळी सामाजिक विकास संस्था आयोजित गुणगौरव सोहळ्यास उपस्थिती. सायंकाळी ४.०० वा. आदगांव, ता.श्रीवर्धन येथून माणगांवकडे प्रयाण. सायंकाळी ५.१५ वा.माणगांव आगमन व कार्यकर्त्यांच्या गाठी भेटी. कार्यक्रमानंतर माणगांव येथून वाहनाने सुतारवाडीकडे प्रयाण, सुतारवाडी येथे आगमन व राखीव.

## गोखले महाविद्यालयात विशेष लसीकरण मोहीम

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

गोखले एज्यु.सोसायटीच्या श्रीवर्धन येथील कला, वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयात १५ ते १८ वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी विशेष लसीकरण शिबिराचे आयोजन प्राथ. आरोग्य केंद्र, वालवटी (ता.श्रीवर्धन)यांच्या विशेष सहकार्याने करण्यात आले होते. देशात कोरोनाच्या तिस–या लाटेचा संभाव्य धोका असतांनाच नव्या ओमायक्रॉनने सर्वदूर खळबळ माजविली आहे. तिस–या लाटेच्या संभाव्य धोक्याने १५ ते १८ वयोगटातील शाळेतील व शाळाबाह्य विद्यार्थ्यांसाठी सुरक्षिततेच्या भूमिकेतून आयोजित केलेला हा उपक्रम अत्यंत आवश्यकच आहे असे विचार प्राचार्य डॉ.श्रीनिवास जोशी यांनी शिबिराचे वेळी व्यक्त केले. ११ वी आणि १२ वी वाणिज्य व विज्ञान शाखेतील एकूण सुमारे १८५ विद्यार्थ्यांचे यावेळी लसीकरण झाले. एकाच ठिकाणी सर्व विद्यार्थांचे सुरक्षित व मोफत लसीकरणाच्या आयोजनामुळे महाविद्यालय विकास समिती सदस्य शांतीलाल जैन,राजेंद्र भोसले, नितीन सुर्वे तसेच श्रीवर्धन शहरांतील पालकांनी समाधान व्यक्त केले.शिबीर आयोजनासाठी उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ.मधुकर ढवळे, डॉ.मयूर हेगडे, केंद्राधिकारी अमोल केसकर, डॉ.पांडे व त्यांची सर्व टीम यांचे विशेष सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांच्या जास्तीत जास्त सहभागासाठी नवज्योत जावळेकर, उल्हास खोपकर, सौ मृण्मयी भुसाणे, सौ.स्वाती शिंदे, सौ.स्वाती जोंधळे, सौ. वैशाली सावंत यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करुन व विशेष सहकार्य करुन या राष्ट्रीय कार्यक्रमात यशस्वी सहभाग नोंदविला.

## नवनिर्वाचित तहसीलदार रोहन शिंदे यांचे स्वागत

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुड तालुक्यसाठी नवनिर्वाचित तहसीलदार रोहन शिंदे हजर झाले आहेत. त्यांचे मुरुड तालुक्याच्या वतीने स्वागत जिल्हा नियोजन मंडळाचे सदस्य व माजी जिल्हा परिषद सदस्य सुबोध महाडिक यांच्या तर्फे पुष्पगुछ देऊन करण्यात आले.

यावेळी नवनिर्वाचित तहसीलदार मुरुड तालुक्याला लवकर उपलब्ध करून दिल्याबद्दल महाडिक यांनी शासनाचे विशेष आभार व्यक्त केले आहेत. तहसीलदार यांची कायम नियुक्ती नसल्याने असंख्य जनतेची कामे रखडत होती. परंतु आता नवनिर्वाचित तहसीलदार रोहन शिंदे हे आल्याने सर्व शासकीय कामे सुरळीत पार पडतील असा विश्वास यावेळी सुबोध महाडिक यांनी व्यक्त केला आहे. यावेळी असंख्य मान्यवर उपस्थित होते.


मा.श्री.मुजावर साहेब कोर्ट

अर्जदार तर्फे वकील : सौ.रश्मी ब. जाधव

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.११/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२२/०३/२०२२

१) श्रीमती.सिताबाई काशिनाथ खुताडे
वय : ७१ वर्षे, धंदा : घरकाम
२) श्री.बाळकृष्ण काशिनाथ खुताडे
वय : ५० वर्षे, धंदा : नोकरी
३) श्री.दिनेश काशिनाथ खुताडे
वय : ४४ वर्षे, धंदा : नोकरी
क्र.१ ते ३ रा.न्याहाळे खुर्द,
ता.जव्हार, जि.ठाणे/पालघर ४०१६०३ अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णनाची मिळकत ही कै.काशिनाथ नंदु खुताडे ह्यांचे मालकीची होती व आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**ना.कोर्टाच्या स्थळसिमेंत व अधिकार क्षेत्रात नवी मुंबई मधील मौजे : पनवेल (पश्चिम), ता.पनवेल, जि.रायगड येथील, सेक्टर ७ मधील भूखंड क्रं.१४/अे–३७, ज्याचे क्षेत्र ३२ चौ.मी. आहे. अशा वर्णनाची मिळकत आहे.**

कै.काशिनाथ नंदु खुताडे हे दि.३०/०५/२०२१ रोजी न्याहाळे खुर्द येथील राहत्या घरी मृत्यू पावले असून त्यांना अर्जदार क्र.१ ही पत्नी, अर्जदार क्र.२ व ३ मुलगे असे कायदेशीर वारसदार आहेत. तसेच कै.काशिनाथ नंदु खुताडे यांची आई कै.साखरीबाई नंदु खुताडे ह्या सन १९७० चे दरम्यान मृत्यू पावल्या आहेत. सदर मिळकतींबाबत वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी मे.कोर्टात चौकशी अर्ज दाखल केलेला आहे.

अर्जदार हे कै.काशिनाथ नंदु खुताडे यांचे कायदेशीर वारसदार आहेत. त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत हरकती सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये हरकत सादर न केल्यास, ना.कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.१३/१/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्याया, पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्याया, पनवेल**


# साखर सुतारवाडीतील दरडग्रस्त घरांच्या ढिगाऱ्याखाली सापडले दागिने



**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील साखर सुतारवाडी येथे २२ जुलैच्या रात्री अतिवृष्टीदरम्यान भुस्खलन होऊन दरड कोसळल्याच्या दूर्घटनेत २३ घरे जोत्यासह वाहुन गेली होती तर सहा व्यक्तींना आपला प्राण गमवावा लागला होता. पै पै जमवून साठवलेला दागदागिन्यांसह पैसा अडका गाडला गेल्याने अनेकांच्या संसाराची वाताहत झाली. अनेकांना वृत्तपत्रातील तसेच माध्यमांतील कथांमुळे भरमसाठ मदतीचा आधार मिळाला तर अनेकांना पुन्हा उभारण्याचीही संधी मिळाली नाही.

या गावातील दरडग्रस्तांच्या घरांच्या ढिगाऱ्याखाली दागदागिने असून त्यांना दागिन्यांचा आधार मिळेल या आशेने पोलादपूर तहसिलदार यांच्या माध्यमातून आपत्ती निवारणाचे काम सुरू असताना घर वाहुन गेलेले लक्ष्मण नारायण सुतार यांच्या पत्नीचे काही दागिने ढिगाऱ्याखाली सापडले. सरपंच पांडूरंग सुतार व काही जबाबदार ग्रामस्थांनी बाधित कुटूंबाच्या ते स्वाधीन केले असता त्या कुटुंबाच्या डोळ्यात आनंदाश्रू आले.

आ.गोगावले व राजिप सदस्य चंद्रकांत कळंबे यांच्या मार्गदर्शनाखाली साखरचे कार्यकर्ते अनिल मालुसरे यांनी दरडग्रस्त सुतारवाडीतील बाधित घरांच्या ढिगाऱ्याखाली मौल्यवान ऐवज सापडल्यास बाधित कुटूंबियांना आधार होईल, या भावनेतून ढिगारे उपसण्याकामी तहसिल कार्यालयाने सहकार्य करावे, असा पाठपुरावा केला होता.

# कर्जत डोणे महामार्ग ताबडतोब दुरुस्त करावा

## कर्जत भाजपच्यावतीने आंदोलनाचा इशारा

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील कर्जत डोणे महामार्ग ताबडतोब दुरुस्त करावा अशी मागणी कर्जत भाजपच्यावतीने करण्यात आली आहे, महामार्ग दुरुस्त केला नाही तर आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

कर्जत डोणे महामार्ग चे काम गेल्या दोन–तीन वर्षापूर्वी पूर्ण करण्यात आले आहे. हा रस्ता हायब्रीड अन्युटी मध्ये असून ठेकेदाराने दहा वर्षापर्यंत त्याची देखभाल दुरुस्ती करावयाची आहे अनेक दिवस दुरुस्ती करावी अशी मागणी केली होती. त्यानुसार गेल्या दोन–तीन दिवसापासून या रस्त्यावर विविध ठिकाणी दुरुस्तीचे काम सुरू आहे. जिथे काँक्रीट रस्ता आहे तिथे डांबराने खड्डे बुजवले जात आहेत हे पूर्णतः तांत्रिक दृष्ट्या चुकीचे असून ठेकेदारचा फायदा करण्यासाठी अशा पद्धतीचे काम करून घेतले जात आहे? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

डांबर आणि काँक्रीट हे व्यवस्थित चिकटत नाही काही दिवसातच पुन्हा त्यावर खड्डे पडतील आणि येथे अपघात व्हायला पुनश्च सुरुवात होईल. म्हणून या बाबतीत त्वरित लक्ष घालून ठेकेदाराकडून योग्य पद्धतीत काम करून घ्यावे अन्यथा भारतीय जनता पार्टी याविरुद्ध रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करेल असे निवेदन भारतीय जनता पक्षाचे वतीने उपविभागीय अभियंता कर्जत यांना देण्यात आले,

या प्रसंगी भाजप नेते सुनिल गोगटे, तालुका सरचिटणीस संजय कराळे, शहर अध्यक्ष बळवंत घुमरे, युवा मोर्चा शहराध्यक्ष मयूर शितोळे, सांस्कृतिक सेलचे विजय कुलकर्णी आदी पदाधिकारी उपस्थित होते.



# आझादीका महोत्सव निमित्ताने चिकणी प्राथमिक शाळेत स्त्री शक्तीचा सन्मान

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील रायगड जिल्हा परिषदेच्या चिकणी प्राथमिक शाळेत आझादीका महोत्सव या उपक्राअंतर्गत शालेय परिसरातील कर्तुत्ववान स्त्रियांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

प्राथमिक शाळेत आयोजित कार्यक्रमाप्रसंगी सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करण्यात आले.यावेळी सावित्रीबाई फुले अभियानांतर्गत स्त्री शक्तीचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता.

यामध्ये श्रीम .रोहिणी कांबळे (शिक्षिका) कु.अपर्णा चाचे (डॉक्टर), सौ.जान्हवी काते (नर्स), श्रीम. नम्रता कासार (सरपंच काशीद), श्रीम.राजेश्री खेडेकर (आशा सेविका), सौ. श्रावणी काते (अंगणवाडी सेविका), सौ.जान्हवी खेडेकर (शिक्षण प्रेमी), कू. सानिया खेडेकर, कु.वैष्णवी दिवेकर (गुणवान मुली), श्रीम.मंदा नाईक (मदतनीस) यांचा सन्मानचिन्ह व मायेची शाळ देऊन सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष उल्हास दिवेकर, ग्रामसेवक अविनाश पिंपळकर, सामाजिक कार्यकर्ते भिकेश दिवेकर तसेच पालक सारिका सुतार व सखिना खातुर मान्यवर उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे उपशिक्षक राजेंद्र साळावकर यांनी केले.


मा.श्री.गोडसे साहेब

अर्जदारातर्फे वकील
श्री.विशाल अनंत मुंडकर

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर, पनवेल यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१९/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२२/०२/२०२२

१) श्री.कृष्णा हरी सुतार
वय : ५३ वर्षे, धंदा : शेती
२) श्री.श्रीपत हरी सुतार
वय : ६३ वर्षे, धंदा : शेती
३) श्रीमती.सरस्वती गणपत सुतार
वय : वर्षे, धंदा : गृहिणी
४) श्री.सुर्यकांत गणपत सुतार
वय : ३४ वर्षे, धंदा : नोकरी
अर्जदार क्र.१ ते ४ सर्व रा.मु.पो.कोयनावेळे
(घोटकॅम्प), ता.पनवेल, जि.रायगड
५) श्रीमती.संगीता राजेश चिंचघरकर
वय : ३९ वर्षे, धंदा : गृहिणी
अर्जदार क्र.५ रा.घर क्र.४६३, देऊळ कोंड,
लोहारे, ता.पोलादपूर, जि.रायगड
६) श्रीमती.सविता सखाराम सुतार
वय : ६६ वर्षे, धंदा : गृहिणी
अर्जदार क्र.६ रा.मु.पो.सुतारवाडी, कसाई,
रत्नागिरी, खेड–४१५७१८
७) श्रीमती.प्रभावती प्रकाश सुतार
वय : ५६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.पो.वावंजे, ब्राह्मण आळी, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जदार नं.१ व २ हे एकमेकांचे सख्खे भाऊ असून अर्जदार क्र.६ व ७ या त्यांच्या विवाहित बहिणी आहेत. तसेच अर्जदार क्र.३ ते ५ हे अर्जदार क्र.१ व २ आणि अर्जदार क्र.६ व ७ यांचा मयत भाऊ गणपत हरी सुतार यांचे वारस आहेत. अर्जदार क्र.१ व २ आणि अर्जदार क्र.६ व ७ यांचे वडील म्हणजेच अर्जदार क्र.४ व ५ यांचे आजोबा हरी गणु सुतार हे दि.२६/०६/१९८३ रोजी मु.कोयनावेळे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. सदर मयत हरी गणु यांचे मालकीची पनवेल महानगरपालिकेच्या हद्दीतील मौजे : कोयनावेळे, ता.पनवेल, जि.रायगड येथे खालीलप्रमाणे वर्णन केलेली घर मिळकत आहे. सदर घर मिळकतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे :–

**घर मिळकतींचे वर्णन**
**मौजे : कोयनावेळे, ता.पनवेल, जि.रायगड येथील**
**घर मिळकत क्रमांक ४४**
**क्षेत्रफळ ६०.९६ चौरस मीटर**

वर नमूद केलेली घर मिळकत अर्जदारांच्या नावे होण्याकरिता अर्जदारांनी पनवेल महानगरपालिकेच्या संबंधित कार्यालयात चौकशी केली असता त्यांस सक्षम कोर्टाकडून मयत हरी गणु सुतार यांचे वारस असल्याबाबत वारस दाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.१३ माहे जानेवारी सन २०२२ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**


# तळा नगरपंचायतीच्या चारही प्रभागात प्रचाराला जोरदार सुरुवात

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा नगरपंचायतीची निवडणुकीची १३ प्रभागाची एक इंनिग २१ डिसेंबर २१ रोजी पार पडली. उर्वरित ४ जागाची निवडणूक येत्या १८ जानेवारी रोजी होत असल्याने या प्रभागात सध्या १४ उमेदवार रिंगणात असून भाजप, सेना, शेकाप, राष्ट्रवादी, अपक्ष आपले नशीब आजमावण्यासाठी शड्डु ठोकून उभे आहेत. या चार ही प्रभागात उमेदवारी घरोघरी मतदारांच्या भेटीगाठींना जोर आला असून पक्ष कार्यकर्ते प्रयत्नशील असताना दिसत आहेत.

शिवसेनेने दिलेल्या वचननामापुर्ती झाली आहे. तर नियोजीत सर्व विकास कामे यापुढे देखील पुर्ण केली जातील अशा गाव बैठकीत केली जात आहे. विविध पक्षाचे उमेदवार मिटींग घेऊन परीवर्तन घडून आणण्यासाठी आम्हालाच मत देऊन विजयी करा. तर एकिकडे मतदारांना अपेक्षीत विकास घडवून आणला जाईल सामाजिक समस्या देखील सोडवण्यासाठी प्रयत्न केला जाईल. अशी अनेक प्रलोभने देऊन मतदाराना दाखवून आकर्षित केली जात आहेत. या प्रभागात काही उमेदवार नव्याने रिंगणात उतरले आहेत तर काही मुरब्बी असून हि आपले नशीबाची परीक्षा घेत आहेत. या प्रभागातील मतदार सुज्ञ असूनही जिकडे ससा तिकडे पारधी अशी स्थिती होताना दिसत आहेत. ता.१० रोजी अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी चार उमेदवारांनी काढता पाय घेतला असून १४ उमेदवार निवडणूक रिंगणात उभे आहेत. सद्यस्थितीत राजकीय हालचालींना जोरदार सुरुवात झाली आहे. भर थंडीच्या लाटेत राजकीय वातावरण प्रचाराचे झाले आहे. रॅली, गुप्त अंतर्गत प्रचार सुरू आहे. ही निवडणूक चार प्रभागात लढविताना सर्वच पक्षांना येथे ताकद लावावी लागणार आहे. संपूर्ण तालुक्यासह तळावासीयांचे या चार लढतीकडे लक्ष लागून राहिले आहे.


अर्जदार तर्फे वकील
ॲड.निवृत्ती बी. पावशे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१३३५/२०२१
नि.नं.११/ड
ने.ता.०९/०२/२०२२

१) कु.झिशान ईकबाल इनामदार
वय : २७ वर्षे, धंदा : शिक्षण
रा.के.एल.–५/३२/०१, सिडको कॉलनी,
से.३ ई, कळंबोली–४१०२१८, ता.पनवेल, जि.रायगड
२) कु.साहिल ईकबाल इनामदार
वय : २२ वर्षे, धंदा : शिक्षण
रा.के.एल.–५/३२/०१, सिडको कॉलनी,
से.३ ई, कळंबोली–४१०२१८, ता.पनवेल, जि.रायगड
३) श्रीमती.हिना ईकबाल इनामदार
वय : ५० वर्षे, धंदा : नोकरी
रा.के.एल.–५/३२/०१, सिडको कॉलनी,
से.३ ई, कळंबोली–४१०२१८, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, ज्याअर्थी कै.ईकबाल अजिजभाई इनामदार हे रा.के.एल–५/३२/०१, सिडको कॉलनी, से–३ ई, कळंबोली–४१०२१८, ता.पनवेल, जि.रायगड येथील रहिवासी होते व ते दि.२२/०५/२०२१ रोजी हिरानंदानी फोर्टीस हॉस्पिटल वाशी, नवी मुंबई येथे मयत झाले आहेत. त्याअर्थी अर्जदार यांनी कु.झिशान ईकबाल इनामदार व इतर यांचे खालील वर्णन केलेल्या मिळकतीत असलेल्या त्यांच्या सामाईक हिश्श्याबाबत वारस असलेबाबतचा वारस दाखला मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

कै.ईकबाल अजिजभाई इनामदार यांच्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**परिशिष्ट ‘अ’**

**सदनिका नं.७०३ ए विंग सातवा मजला हेरंबा को.ऑप.हौ.सोसा.लि., प्लॉट नं.११, से–८ ई, कळंबोली, नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड. क्षेत्र ६१.९९ चौ.मी. बिल्टअप + ५.३९ चौ.मी. टेरेस ही सदनिका आहे.**

**परिशिष्ट ‘ब’**

**के.एल.–५/३२/०१, से–३ ई, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड क्षेत्र ३३.२१ चौ.मी. बिल्टअप + २४.०० चौ.मी. कारपेट**

**परिशिष्ट ‘क’**

तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका सुधागड, तसेच रायगड जिल्हा परिषदेच्या आणि पंचायत समिती सुधागड ह्यांचे हद्दीतील आणि मे.सब रजिस्टार सो.सुधागड ह्यांचे अधिकार क्षेत्रातील मौजे : गोंडळे, सुधागड, जि.रायगड, तलाठी सजा नांदगाव ग्रामपंचायत नांदगाव, ता.सुधागड, जि.रायगड येथील रेव्हेन्यू रेकॉर्डप्रमाणे असून सदरहू मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मौजे : गोंडाळे, ता.सुधागड, जि.रायगड येथील**

| स.नं.गट भूमापन क्र. | भूमापन क्रमांकाचा उपविभाग | क्षेत्र हेक्टर आर | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| २८ | – | १–५७–० <br> ०–३७–० <br> १–९५–० | ०–५० |

**परिशिष्ट ‘ड’**

**सदनिका नं.०९, बिनशेती प्लॉट–ग.नं.२२१/९, साई पार्क या रहिवासी सदनिकांच्या स्किम मधील, ब्लॉक ‘सी’ या इमारतीतील दुसऱ्या मजल्यावरील या सदनिकेचे चटई क्षेत्रफळ ७२७.९५ चौ.फूट (६७.६५ चौ.मी.) मौजे : साकुरी, ता.राहता, जि.अहमदनगर.**

वरील अर्जदार हे मयत कै.ईकबाल अजिजभाई इनामदार यांचे कायदेशीर वारसदार आहेत, या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून या न्यायालयात एक महिन्याच्या आत हजर राहून हरकत घ्यावयाची आहे. याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, हा कालावधी संपण्याआधी योग्य ती हरकत घेतली नाही तर हे मे.न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल पुरावा घेण्याची कार्यवाही करील आणि ते जर कै.ईकबाल अजिजभाई इनामदार यांचे वारस असल्याचे शाबीत झाल्यास त्यास वारसदाखला मंजूर करील याची दखल घ्यावी.

आज दि. रोजी माझी सही, न्यायालयाच्या शिक्क्यासह दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



राव साहेब

ॲड.अनिरुद्ध गो.तुळसणकर, पनवेल
अर्जदारांचे वकील

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१९७९/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१६/०२/२०२२

१) श्रीमती.कुसुम विष्णू बहिरा
वय : ७७ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.प्रशांत विष्णू बहिरा
वय : ४८ वर्षे, धंदा : व्यवसाय
३) श्री.संजय विष्णू बहिरा
वय : ४३ वर्षे, धंदा : व्यवसाय
क्रं.१ ते ३ रा.फ्लॅट नं.३०३/३०४,
द्वारकामाई बिल्डींग नं.७/बी, गुरुशरणम कॉम्प्लेक्स,
एम.जी.रोड, विश्राळी नाका, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
४) सुचिता विष्णू बहिरा
वय : ४६ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.रुम नं.०८, गोल्डन ड्रिम आर्केड, एमटीएनएल
ऑफिस जवळ, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, १) अर्जदार क्रं.१ यांचे पती व अर्जदार क्रं.२ ते ४ यांचे वडील कै.विष्णू गणपत बहिरा यांचे गांधी हॉस्पिटल, पनवेल येथे दि.२४/०३/२०२१ रोजी देहावसान झाले आहे. तसेच कै.विष्णू गणपत बहिरा यांची आई कै.बारकूबाई गणपत बहिरा यांचे देखील दि.१९/११/१९८२ रोजी देहावसान झाले आहे. कै. विष्णू गणपत बहिरा यांना हिंदू वारसा कायद्याप्रमाणे अर्जदार क्रं.१ ही विधवा पत्नी व अर्जदार क्रं.२ ते ४ ही अपत्ये असे कायदेशीर वारस आहेत. श्रीमती. कुसूम विष्णू बहिरा वगैरे ह्यांनी कै.विष्णू गणपत बहिरा यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीपोटी वारसापत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. कै.विष्णू गणपत बहिरा यांच्या नावे असलेल्या स्थावर व जंगम मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**

अ) व्हेस्पा एसएक्सएल १५० कंपनीची, एमएच ४६–एटी–९०९६ अशा नंबरची एमसीवायएल मोटर साईकल, जिचा चेसी नं.एमईटी ००० ओजेएयुडी ००४४६६ असा असून इंजिन नं.एम ४४० एम ३००६६८४ असा आहे.

ब) हिरो मोटर्स कंपनीची, सीसीआरआरडीबी रंगाची एमएच ४६–टी–७०५८ अशा नंबरची प्लेजर दुचाकी, जिचा चेसी नं.एमबीएलजेएफ १६–ईएफडीजीबी ०९६५८ असा असून इंजिन नं.जेएफ १६ ईसीडीजीबी ०८२९० असा आहे.

क) कै.विष्णू गणपत बहिरा यांचे नांवे मे.जी.एम.वाईन्स या नावाने मा.अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क, रायगड अलिबाग यांनी प्रदान केलेले दारु विक्री बाबत दारु परवाना / अनुज्ञाप्ती (लिकर लायसन्स) क्रं.एफ.एल.२ अनु क्रं.१९/९५–९६ असे लायसन्स आहेत.

ड) कै.विष्णू गणपत बहिरा यांचे नांवे मे.जी.एम.वाईन्स या नावाने मा.अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क, रायगड अलिबाग यांनी प्रदान केलेले देशी दारु विक्रीबाबत दारु परवाना/अनुज्ञाप्ती (लिकर लायसन्स) क्रं.२२/९३–९४ असे लायसन्स आहे.

इ) मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील अंतिम भूखंड क्रं.२८१ वर बांधण्यात आलेल्या रॉयल रेसिडेन्सी या इमारतीचे सहाव्या मजल्यावरील निवासी सदनिका क्रं.६१०, बिल्डींग क्रं.०२, क्षेत्र ७३१ चौ.फूट कारपेट अधिक १५० चौ.फूट ओपन टेरेस अशा वर्णनाची निवासी सदनिका.

ई) मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील अंतिम भूखंड क्रं.२०५/१२० सोसायटी प्लॉट क्रं.३६ वर बांधण्यात आलेल्या कनक समृद्धी या इमारतीचे दुसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका क्रं.२०२, क्षेत्र ५१९ चौ.फूट कारपेट + २०० चौ.फूट टेरेस + ६१ चौ.फूट कबर्ड + १०३ चौ.फूट फ्लॉवर बेड अशा वर्णनाची निवासी सदनिका.

वर श्रीमती.कुसुम विष्णू बहिरा वगैरे हे कै.विष्णू गणपत बहिरा यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट श्रीमती.कुसुम विष्णू बहिरा वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.विष्णू गणपत बहिरा यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.१३/०१/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## राजेंद्र विठ्ठल मानकर यांचे आकस्मित निधन

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा तहसील कार्यालयातील चतुर्थ श्रेणी कर्मचारी राजेंद्र विठ्ठल मानकर रा.महागांव याचे सोमवार ता.१०रोजी रात्री १०वा.हृदयविकाराच्या झटक्याने महागांव येथे दुःखद निधन झाले मृत्यू समयी ५९ वर्षाचे होते. पश्चात पत्नी मुलगी दोन मुलगे असा परिवार आहे.



भाजप द.महिला अध्यक्षा हेमा मानकर यांचे दिर होते. राजेंद्र सुस्वभावी, हसरे, शांत, संयमी व्यक्तीमत्व होते. तळा तहसील मध्ये प्रामाणिकपणे १५ वर्ष सेवेत होते. डिसेंबर२२रोजी सेवा निवृत्तीचा काळ होता. परंतु काळाने त्यापुर्वीच अचानक झडप मारली. राजेंद्र यांच्या दुःखद घटनेची वार्ता समजताच तळा शहरात शोक व्यक्त करण्यात आला. तहसील कार्यालयात सर्व कर्मचारी यांनी दुःख व्यक्त केले. अंत्यसंस्कार वेळी महागांव पंचक्रोशीतील नागरिकनातेवाईक हितचिंतक, मित्रमंडळी तहसीलदार कनशेट्टी सहकारी वर्ग तलाठी उपस्थित होते. दशविधी ता.१९/१/२१ बुधवार व उत्तर कार्य २१/१/२१शुक्रवार रोजी रहात्या घरी महागांव ता. तळा येथे होणार आहे असे कळविले आहे.

## मोतीबिंदू शिबीर उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । उरण**

जनसेवेतून आनंद देणा–या वशेणी इतिहास संपादकीय मंडळाने वशेणी परिसर मोतीबिंदू मुक्त व्हावा असा संकल्प केला आहे. या संकल्पाचा दिनांक १२/१/२०२२ रोजी दुसरा टप्पा संपन्न झाला. पहिल्या टप्प्यात डिसेंबर २०२१ मध्ये ४६ रुग्णांचे मोफत मोतीबिंदू ऑपरेशन करण्यात आले. तर दुस–या टप्प्यात शंकरा आय हॉस्पीस्टल नवीन पनवेल आणि वशेणी इतिहास संपादकीय मंडळ आयोजीत मोतीबिंदु शिबिरात परिसरातील सोशल डिस्टंस, सॅनिटायझर व मास्क यांचा वापर करून ११७ रुग्णांची तपासणी करण्यात आली.या ११७ पैकी ४८ रूग्ण शंकरा आय हॉस्पीस्टल नवीन पनवेल येथे मोतीबिंदू ऑपरेशन साठी रवाना करण्यात आले.

सदर शिबिर यशस्वी करण्यास पुरूषोत्तम पाटील, डॉ. रविंद्र गावंड, कैलास पाटील, विश्वास पाटील, किशोर म्हात्रे, मिलिंद पाटील,अनंत तांडेल, राजेश पाटील, कु.निसर्ग म्हात्रे, कु.पारिख म्हात्रे आदींनी विशेष सहकार्य केले. शिबीर यशस्वी रित्या संपन्न झाल्याने सर्वांचे कार्यवाहक मच्छिंद्रनाथ का.म्हात्रे यांनी आभार मानले.

# पेण येथील रेल्वे प्रवाशांना दिलासा ; दिवा रत्नागिरी दिवा पॅसेंजरला पेण येथे थांबा

### भाजप उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांच्या प्रयत्नांना यश

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण रेल्वे स्थानकात जलदगती गाड्यांना थांबा मिळावा या पेणकरांच्या मागणीला यश आले असून दिवा – रत्नागिरी दिवा ही पॅसेंजर गाडी पेण बरोबरच आपटा, जिते व कासु रेल्वे स्थानकात थांबा मिळाला असल्याने रेल्वे प्रवाशांत आनंद व्यक्त केला जात आहे. पेण येथील रेल्वे प्रवाशांना दिलासा मिळाला असून भाजप उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांच्या प्रयत्नांना प्राथमिक यश आले आहे.

मध्य रेल्वेवरील पेण येथील रेल्वे प्रवाशांना मध्य रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी नेहमीच सापत्न पणाची वागणूक दिली आहे. रायगड जिल्ह्यातील मध्यवर्ती स्थानक असलेल्या पेण स्थानकात एक ही जलदगती रेल्वे गाडीला थांबा नसल्याने पेण, वडखळ, अलिबाग, पोयनाड, मुरूड परिसरातील प्रवाशांना जलदगती गाडी साठी



पनवेल, कल्याण, कर्जत, लोणावळा व मुंबई येथे जावे लागत आहे.

पेण रेल्वे स्थानकात जलदगती रेल्वेगाडीला थांबा मिळावा यासाठी मी पेणकर आम्ही पेणकर शाश्वत विकास संघर्ष समिती व पेण येथील रेल्वे प्रवाशांबरोबरच रायगड जिल्हा भाजपचे उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. वैकुंठ पाटील यांनी या बाबत तीन महिन्यांपूर्वी रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, केंद्रीय मंत्री कपिल पाटील, माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, यांची मुंबई येथील रेल्वे मुख्यालयात भेट घेऊन याबाबत चर्चा करुन त्यांना पेण येथील रेल्वे प्रवाशांच्या लेखी भावना त्यांच्या पर्यंत पोहचवल्या होत्या.

या बाबत सकारात्मक तोडगा काढण्याचे आश्वासन रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी दिले होते. त्यानुसार १५ जानेवारी पासून दिवा रत्नागिरी दिवा ही पॅसेंजर रेल्वे गाडी पेण, जिते, आपटा, कासु व नागोठणे बरोबरच रोहा येथील स्थानकात थांबणार आहे. कोरोना काळात बंद असलेली मेमु गाडी सुरु करण्यासाठी देखील पेण मधील नागरिकांना संघर्ष करावा लागला होता.

> मध्य रेल्वेने पेण मधील प्रवाशांवर नेहमीच अन्यायाची भूमिका घेतली होती. पेण स्थानकात जलदगती रेल्वे गाडीना थांबा मिळावा ही आमची मागील अनेक वर्षांपासून मागणी होती. या साठी आपण रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांची भेट घेऊन प्रवाशांच्या भावना त्यांच्याकडे मांडल्या होत्या. त्यानुसार आज पेण स्थानकात पहिल्या पॅसेंजर रेल्वे गाडीला थांबा मिळाला आहे. पुढील काळात सर्वच जलदगती गाड्यांना थांबा मिळावा यासाठी प्रयत्न केले जातील.
>
> **- वैकुंठ पाटील,**
> **भाजप उपाध्यक्ष, रायगड**

## इंदापुर येथे कातकरी उत्थान अभियान; प्रांत प्रशाली जाधव यांचे मार्गदर्शन



**दै.रायगड नगरी । माणगाव**

महाराष्ट्र शासनाच्या महाराजस्व अभियानांतर्गत जिल्हाधिकारी कल्याणकर, यांच्या सूचनेनुसार माणगाव च्या उपविभागीय अधिकारी प्रशाली जाधव दिघावकर आणि माणगाव तहसीलदार प्रियांका कांबळे यांच्या मार्गदर्शना नुसार आज इंदापूर येथे कातकरी उत्थान अभियान राबविण्यात आले.

समाजातील मागासलेल्या घटकाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन हा कार्यक्रम राबवित आहे यामध्ये शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली जाते त्यातून त्या योजनांसाठी पात्र असणारे लाभार्थी शोधले जातात आणि त्यांना त्या योजनांचा लाभ दिला जातो. तसेच आदिवासी बांधवांच स्थलांतर रोखणे त्यासाठी महसुल विभाग सर्वदिप विकास संस्था गेल्या अनेक वर्षांपासून काम करत आहे या अंतर्गत प्रत्येक कातकरी वाडीवर जाऊन सर्वे करण्यात आला व विविध योजनापासू वंचित असलेले लाभार्थी शोधण्यात आले या कामी संस्थेचे महेश मोरे, काणेकर, मोरे या कार्यकर्त्यांची मदत झाली या अंतर्गत तसेच इंदापूर मंडळाचे मंडळ अधिकारी विश्वास गडदे तलाठी समीरा खाडे साले तलाठी जोत्स्ना शिंदे प्रियांका वांगे अमित उजगरे, विशाल वाघमारे इंदापूर विभागातील सर्व तलाठी उपस्थित होते तसेच इंदापूर प्राथमिक आरोग्य केद्राच्या डॉ. रोशनी आदिवासी विकास विभाग पेण येथील निरीक्षक उपस्थित होते. यात इंदापूर व आठ भागातील सर्व कातकरी बांधव उपस्थित होते. या कार्यक्रमा अंतर्गत कातकरी बांधवाना १६) जातीचे दाखले, १०) उत्पन्नाचे दाखले, १०) वयाचे दाखले २७) आधार कार्ड १७) असे फॉर्म भरण्यात आले आहेत.

## वेध सह्याद्रीतर्फे जिजाऊ जयंती उत्साहात साजरी

### रक्तदान शिबिरात ५० हुन अधिक रक्तदात्यांनी नोंदवला सहभाग

**दै.रायगड नगरी । खोपोली**

स्वराज्याच्या दोन्ही छत्रपतींना घडवणाऱ्या राजमाता जिजाऊ माँसाहेब यांची जयंती १२ जानेवारी रोजी वेध सह्याद्री मार्फत खोपोली सह संपूर्ण खालापूर तालुक्यात उत्साहात साजरी करण्यात आली. खोपोली येथील प्रथम सत्रात छत्रपती शिवाजी महाराज स्मारक शिळफाटा येथे पूजन व आरती करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली यावेळी शहरातील सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र फक्के व वाहतूक पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

दुसऱ्या सत्रात वेध सह्याद्री मार्फत समर्पण ब्लड बँक यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या रक्तदान शिबिरात ५० हुन अधिक रक्तदात्यांनी सहभाग नोंदवला. या शिबिराचे उदघाटन खोपोलीचे पोलीस निरीक्षक शिरीष पवार यांच्या हस्ते पार पडले शिबिरात महिलांची विशेष उपस्थिती पहायला मिळाली. या सर्व कार्यक्रमास खोपोलीचे माजी नगराध्यक्ष दत्ताजीराव मसुरकर, शिवसेना खोपोली शहर प्रमुख तथा मा. नगरससेवक सुनील पाटील, मा. नगरसेवक मोहन औसरमल, मनीष यादव, मनसेचे खोपोली शहर अध्यक्ष अनिल मिंडे, भाजपाचे हेमंत नांदे, अजय इंगुलकर, युवक



राष्ट्रवादीचे अतुल पाटील यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर व सामाजिक कार्यकर्ते यांनी उपस्थिती दाखवत उपक्रमाचे कौतुक केले. मोहिमेचे मोहीम प्रमुख म्हणून करण साळवी व वेध सह्याद्रीच्या सर्व सदस्यांनी यांनी उत्तम रित्या नियोजन करत कार्यक्रम यशस्वी केला. छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती ज्याप्रमाणे उत्साहात साजरी होते. त्याच प्रमाणे या दोन्ही छत्रपतींना घडवणाऱ्या राजमाता जिजाऊ माँसाहेब यांची जयंती सुद्धा सर्व ठिकाणी उत्साहात साजरी व्हावी, या उद्देशाने यावर्षी पासून वेध सह्याद्री मार्फत विविध विभागांमध्ये राजमाता जिजाऊ जयंतीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये खरपाडा, चौक, कर्जत, सवरोली, आत्करगाव, पंचक्रोशी, ढेकू, कलोते, शिरवली, चिंचवली गोहे, धामणी, सावरोली,भातान, आस्रोटी, तुपगाव, वावरले, या विभागांत जिजाऊ जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

## महामार्ग पोलीसांच्या वाकण मदत केंद्रातील हद्दीत अपघाती मृत्यू मध्ये ५० टक्के घट

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

महामार्ग पोलीसांच्या वाकण मदत केंद्रातील हद्दीत अपघाती मृत्यू मध्ये ५० टक्के घट झाल्याची माहिती माहामार्ग पोलिस वाकण मदत केंद्रातील पोलिस उपनिरिक्षक परशुराम भोईर यांनी दिली.

मुंबई – गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वरील महामार्ग पोलिसांच्या वाकण मदत केंद्राची हद्द वडखळ ते इंदापूर आणि राज्य महामार्ग क्रमांक ५४८ ए वाकण ते दुरशेत अशी ७९ की.मी. असून सन २०२० च्या तुलनेत या हद्दीतील माहामार्गावर घडलेल्या अपघातातील मृत्यू होणा–यांचा आकडा सुमारे ५० टक्के घटल्याने समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

उपलब्ध माहितीनुसार सन २०२० मध्ये २३ प्राणांकीत अपघात झाले असून त्यामध्ये २८ जण मृत्युमुखी पडले होते, तर सन २०२१ मधील प्राणांकीत अपघाताच्या प्रमाणामध्ये सुमारे ५० टक्के घट होऊन १४ प्राणांकीत अपघातामध्ये १४ जणांचे मृत्यू झाले आहे. तसेच इतर अपघातांमध्ये देखील मोठ्या प्रमाणावर घट झालेली आहे.

तसेच सन २०२१ मध्ये वाहतूक नियमांचा भंग करणाऱ्या वाहन चालकाविरुद्ध मोठ्याप्रमाणावर कारवाई झाल्याचे दिसून येत आहे. सन २०२१ मध्ये ३८ हजार ७९८ बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली असून त्यामधून एक कोटी ६५ लाख १४ हजार आठशे रुपये दंड आकारण्यात आला आहे. महामार्गावर नियमितपणे गस्त, वाहन चालकांमध्ये करण्यात आलेली जनजागृती, अपघातग्रस्तांना मदत करण्यासाठी स्थापन करण्यात आलेली हायवे मृत्युंजय दुत योजना याचाच एकत्रित परिणाम म्हणून महामार्ग पोलिस केंद्र वाकणच्या हद्दीमध्ये प्राणांकीत अपघातांच्या प्रमाणामध्ये मागील वर्षाच्या तुलनेत निम्म्यापेक्षा घट झालेली आहे.

## ६५ वर्षीय वृद्ध बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आसुडगाव येथे राहणारे ६५ वर्षीय मांगो कुंडलिक महाजन हे घरातून कोणाच काही न सांगता निघून गेले आहेत. ते परत न आल्याने हरवले असल्याची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

ते अंगाने सडपातळ, उंची पाच फूट, रंग गोरा, चेहरा उभट असून अंगात पांढरा रंगाचा शर्ट, पॅन्ट, चप्पल घातली आहे. त्यांच्या डाव्या खांद्यावर तीळ असून डाव्या पायाने वाकडे चालतात. त्यांना मराठी, खानदेशी भाषा बोलता येते. या वृद्ध ईसमाबाबत अधिक माहिती असल्यास पोलीस नाईक एबीपवार यांच्याशी संपर्क साधावा.

## बापानेच केला मुलीचा विनयभंग


**दै.रायगड नगरी । पनवेल**

खांदेश्वर पोलिस ठाण्याच्या हद्दीत बापानेच मुलीचा विनयभंग केल्याची घटना घडली आहे. आरोपी विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २२ वर्षीय तरुणी ही आपल्या वडिलांसोबत राहते. वडिलांनी तिला मारहाण करून धमकी दिली. आणि तिचा विनयभंग केला.

## चिरनेरच्या जंगलात गुंजतोय विविधरंगी पक्षांचा मंजुळ किलबिलाट ; निसर्गप्रेमींसाठी पर्वणी

**दै.रायगड नगरी । उरण**

पावसाळा सरून थंडीची चाहूल लागताच डोंगर रांगांमधील जंगलात विविध रंगी पक्षांची रेलचेल सुरू होते. त्यांच्या मंजुळ किलबिलाटाने मन प्रसन्न होते. हा अनुभव घ्यायचा असेल तर उरण तालुक्यातील निसर्गसंपन्न चिरनेरच्या जंगलात जावे लागेल. या गुलाबी थंडीच्या वातावरणात चिरनेरचे जंगल विविध रंगी पक्षांनी फुलून गेले आहे. त्यांच्या मंजुळ किलबिलाटाने निसर्गप्रेमीं सुखावून गेले आहेत.



उरण तालुक्याच्या पूर्व भागात निसर्गसौंदर्याने नटलेल्या डोंगरकुशीत चिरनेर हे ऐतिहासिक गाव वसले आहे. चिरनेरच्या पूर्व भागात विस्तिर्ण जंगल पसरले आहे. या जंगलात मोठ्या प्रमाणात जंगली पशुपक्षांचे वास्तव्य आहे.या जंगलात मुबलक नैसर्गिक पाणवठे असल्याने हे जंगल पशुपक्षांचे आश्रय स्थान झाले आहे.

सध्या गुलाबी थंडीचे मस्त वातावरण असल्याने जंगल भ्रमंती करताना या जंगलात विविधरंगी अनेक प्रजातींच्या पक्षांचे मनोहारी दर्शन होते. मोर, लांडोर, रानकोंबडे, सुतार पक्षी, कोकीळ, बुलबुल, यलो स्पॅरो, गवळण, सोनकावळे, तितर, धनेश गरुड, पोपट, दयाळ यासारखे विविध जातीचे पक्षी सहज नजरेस पडतात. त्यांचा मंजुळ किलबिलाट मनाला सुखावून जातो.

या जंगलात आदिवासी समाजाची मोठी वस्ती असूनही या समाजातील तरुणांनी जंगलातील पशु–पक्षांची शिकार न करण्याचा निर्धार केल्याने चिरनेरच्या जंगलात सध्या विविध पशुपक्षां बरोबरच मोर–लांडोरींची संख्या झपाट्याने वाढली आहे. मात्र काही शिकारी या पशुपक्षांची चोरटी शिकार करीत असल्याने आदिवासी बांधव नाराजी व्यक्त करीत आहेत. चिरनेरचे जंगल पक्षी प्रेमींना पक्षी निरीक्षणासाठी पर्वणी ठरणार आहे. या जंगतील पशुपक्षांना अभय दिले तर निसर्गप्रेमी जनतेला हा निसर्गठेवा नेहमीच अनुभवायला मिळणार आहे. शहराच्या गर्दीतून निघून चिरनेरच्या जंगलात पायपीट केली तर निसर्गप्रेमींना नक्कीच सुखद अनुभव मिळणार आहे.

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अंतर्गत होत असलेल्या कामांत ठेकेदारांची चालढकल

**दै.रायगड नगरी । माथेरान**

मागील काही वर्षांपासून इथे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत नेमून दिलेल्या ठेकेदारांकडून नळ जोडणी तसेच मोठं मोठया पाईप लाईन टाकण्याची कामे सुरू आहेत. ही कामे करताना संबंधीत ठेकेदारांने केवळ काम एके काम हीच भूमिका अवलंबून सरसकट चांगल्या रस्त्यांची खोदाई करीत असताना रस्ते पूर्ववत न करता पुढील कामे करण्यावर अधिकाधिक भर दिला आहे.

सर्वत्र धूळ विरहित रस्ते असावेत यासाठी लाखो रुपये खर्च करून गावात त्याचप्रमाणे अन्य महत्वाच्या ठिकाणी पेव्हर ब्लॉकचे रस्ते एमएमआरडीए च्या माध्यमातून तयार केले जात आहेत. या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अंतर्गत एस.एम.सी या एजन्सीमार्फत माथेरान शहरात पाण्याची नवीन पाईप लाईन टाकण्याचे काम सुरू आहे परंतु या ठेकेदारांना याबाबत काहीएक स्वारस्य दिसत नसून याकडे लक्ष देण्यास सुध्दा कुणीही पुढे येत नव्हते याकामी भाजप शहराध्यक्ष प्रवीण सकपाळ, सरचिटणीस राजेश चौधरी, माजी नगरसेवक चंद्रकांत जाधव, प्रदीप घावरे, यांनी नगरपालिका अभियंता स्वागत बिरंबोळे यांच्या समवेत पाहणी करून शहरातील खोदून ठेवलेले रस्ते लवकरात लवकर दुरुस्त करून घ्यावेत अन्यथा यापुढे कुठेही खोदून दिले जाणार नाही व स्थानिक प्रशासनाची परवानगी नसेल तर गुन्हा नोंदविण्यात येईल असे भाजपच्या शिष्टमंडळाकडून सांगण्यात आले.



## पनवेलमध्ये एक लाख ३८ हजार ७९८ पशुधन, कृत्रिम रेतन पद्धतीतुन ३९५ वासरांचा जन्म

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसराचा झपाट्याने विस्तार होत आहे. तसेच विकास कामे प्रचंड वेगाने होत आहेत असे असले तरी २०१८ च्या पशुगणनेनुसार पनवेल परिसरातील एकूण पशुधन एक लाख ३८ हजार ७९८ आहे. यात गाई, म्हशी, शेळ्या, मेंढ्या, डुकरे, पक्षी, घोडा यांचा समावेश आहे. २०२१ मध्ये कृत्रिम रेतन पद्धतीतुन ३९५ वासरांचा जन्म देण्यात आलेला आहे.

पशुधन हे ग्रामीण भागात चरितार्थाचं महत्वाचं साधन आहे. पशुधन पालनाचे अनेकविध फायदे आहेत. केवळ चरितार्थच नाही तर निसर्गाचा समतोल राखण्यात तसेच वनस्पती सृष्टीस पूरक असे हे पशुधन आहे. तालुक्यात शेती सोबतच दुग्ध व्यवसाय केला जातो. पनवेल पंचायत समिति अंतर्गत एकूण १० पशु वैद्यकीय संस्था कार्यरत आहेत. नोव्हेंबर २०२१ पर्यंत १० हजार ५८ पशुपक्षी व जनावरांचे उपचार करण्यात आले आहेत. तर १२ हजार ४६९ जनावरांचे लसीकरण झाले असल्याची माहिती देण्यात आली आहे. २०२० मध्ये १ हजार १४८ जनावरांचे कृत्रिम रेतन करण्यात आले. यात ४२६ वासरांना जन्म देण्यात आला. तर २०२१ मध्ये १ हजार २४३ कृत्रिम रेतन करण्यात आले. यावेळी ३९५ वासरांचा जन्म झाला. २०२० मध्ये १४१ जनावरांची शस्त्रक्रिया करण्यात आली तर २०२१ मध्ये ९९ जनावरांची शस्त्रक्रिया करण्यात आली. २०२० मध्ये ९३ हजार ३९८ जनावरांचे लसीकरण करण्यात आले. तर २०२१ मध्ये १२ हजार ४६९ जनावराना लस देण्यात आली.

## पालीत वाहतुकीचे नियम मोडणाऱ्याला कोर्टाने सुनावला पाच हजाराचा दंड

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

पाली सुधागड सह जिल्ह्यात वाहतूक पोलिसांकडून वाहनचालकांची तपासणी सुरू आहे, यादरम्यान वाहनचालकांची कागदपत्रे व लायसन्स तपासले जात आहेत. मात्र अनेकदा काही नागरिक पोलिसांना सहकार्य न करता पोलिसांशी हुज्जत घालतात, अरेरावी करतात, असाच प्रकार पालीतील पोलिसांबाबत घडला.मात्र यावेळी पोलिसांनी त्या व्यक्तीची तक्रार थेट न्यायालयाकडे केले. त्यानंतर त्या व्यक्तीला न्यायालयात हजर केले असता मा. पाली कनिष्ठ न्यायालयाने त्यांना ५ हजाराचा दंड ठोठावला, त्यामुळे वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांचे चांगलेच धाबे दणाणले आहेत.

यासंदर्भात फिर्यादी पो ह ज्ञानेश्वर जाधव यांच्या फिर्यादीवरून सविस्तर हकीकत अशी की पाली खोपोली रोडवर गणेश हॉटेलजवळ बिरप्पा कलप्पा पुजारी (३८ )हा आपल्या ताब्यातील होंडा शाईन क्र एम एच १२ आर व्ही ७३७९ ही मोटारसायकल वाहन परवाना नसताना चालवीत असताना आढळून आला. मात्र यावेळी पोलिसांशी हुज्जत घातल्याने पोलिसांनी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी पाली यांच्यासमोर हजर केले. यावेळी न्यायालयाने बिरप्पा कलप्पा पुजारी याला पाच हजाराचा दंड ठोठावला. नागरिकांनी वाहतूक नियमांचे पालन केल्यास अपघाती घटनांवर नियंत्रण येईल, लायसन्स व कागदपत्रे सोबत ठेवल्यास पोलिसांशी वाद होणार नाहीत, शिवाय दंड देखील ठोठावला जाणार नाही, असे पोलिसांनी सांगितले.